MHKO050000492007

**नि.दरखास्त क्र.४/२००७.**
**एकनाथ हरी कुलकर्णी विरूध्द महादेव यशवंत पाटील.**

**निशाणी क्रमांक १ वर आदेश**

लॉ इज हायली ॲलर्जीक टू प्रोक्रास्टीनेशन असे म्हटले आहे. वीस वर्षापुर्वी पारीत हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीकरीता प्रस्तुतची दरखास्त दाखल. दि. ३१.०८.२०१६, ०२.०२.२०२३ व दि.१६.०२.२०२३ रोजी चे आदेश वाचले. विस्तुत आदेश पारीत केल्यानंतर देखील कोणीही उपस्थित राहत नाही, आदेशित बाबींची पुर्तता करत नाहीत.

**२.** न्यायालयाचा वेळ खूप मौल्यवान आहे. खुप मोठया प्रमाणावर न्यायप्रविष्ठ प्रकरणांचा गुणदोषांवर निपटारा करण्याकरीता वेळ लागत आहे. एकीकडे आपण लोकअदालत, मेडीअेशन, आरबिट्रेशन, स्पेशल ड्राईव्ह, प्ली बारगेनिंग, मध्यस्थी केंद्र व तत्सम मार्गाचा अवलंब करत न्यायप्रविष्ठ प्रकरणांची संख्या कमी करण्याचा कसोसीने प्रयत्न करत आहोत. अशा परिस्थितीमध्ये विस्तुत आदेश पारीत केल्यानंतर देखील आदेशित बाबींची पुर्तता होत नसल्यामुळे प्रस्तुत प्रकरणांसारखी प्रकरणे आणखी काही दिवस प्रलंबित ठेवणे म्हणजे न्यायालयाचा मौल्यवान वेळेचा अपव्यय ठरेल. तथापि, प्रकरणाचे वय, प्रकरणाचे स्वरुप पाहता न्यायाच्या तत्वाने खालील अटींवर आणखी एक मुदत मंजुर.

**अट :—**

**१.** दि.०२.०२.२०२३ रोजी पारीत आदेशानुसार पुर्तता करावी. पुर्तता न केल्यास प्रकरण पुढे चालविण्यामध्ये हित संपले आहे असे अनुमान काढून न्यायोचित आदेश पारीत केले जातील.

**२.** सदरचा आदेश या न्यायालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करावा.

Digitally signed by GHULE GANESH AMBADAS
Date: 2023.07.01 17:24:43 +0530

(गणेश अं.घुले)
३रे सह दिवाणी न्यायाशीश क.स्तर,
इचलकरंजी, जिल्हा कोल्हापूर
न्यायालय क्रमांक ३
जे.ओ.कोड : २५९४.

दिनांक : ३०.०६.२०२३.